# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित

## थकबाकी कर्ज वसुली धोरण

### अ) सहकारी संस्थांकडील कर्ज थकबाकी वसुलीची कार्यप्रणाली :-

**शाखा पातळीवरील कारवाई :-**

ज्या कर्जदार सहकारी संस्था, मंजूर कॅश क्रेडिट, क्लिन कॅश क्रेडिट, नजरगहाण, बिल्स डिस्कांऊटींग कर्जाची उचल घेतल्या नंतर कर्ज कालावधीत सलग ९० दिवसात कर्ज खात्यावर कोणताही व्यवहार करीत नाहीत, तसेच सदर कर्जावरील व्याजाचा भरणा दरमहा नियमितपणे न केल्याने कर्ज खाते ओव्हरड्रॉन होऊन एन.पी.ए. झाले आहे, ज्या कर्जदार संस्थांनी कर्ज नुतनीकरणाचे प्रस्ताव कर्जाची मुदत संपण्यापूर्वी ६० दिवस अगोदर सादर केलेले नाहीत, ज्या कर्जदार संस्थाच्या कर्ज नूतनीकरणास बँकेने मंजूरी दिलेली आहे. परंतु सदर संस्था कर्ज नुतनीकरणाचे प्रस्ताव संपूर्ण कर्ज दस्तऐवज व अनुषंगिक कागदपत्रांसह विहीत वेळेत सादर करीत नाहीत. तसेच मुदत कर्ज परतफेडीच्या हप्त्यांचा नियमित भरणा करीत नाहीत, अशा संस्थांच्या पदाधिकाऱ्यांशी शाखाव्यवस्थापक किंवा शाखेतील अधिकारी यांनी संपर्क साधून कर्ज खात्याबाबतची आवश्यक ती पूर्तता करुन घेणेबाबत तसेच थकबाकी वसुली करणेबाबत पाठपुरावा करावा. ज्या संस्थांनी कर्ज खात्याबाबतची पुर्तता कार्यवाही केलेली नाही तसेच थकबाकीचा भरणा केलेला नाही. अशा संस्थांना, संस्थेच्या सर्व पदाधिकारी व सर्व संचालकांना कर्ज वसुली धोरणाप्रमाणे त्यांच्या राहण्याच्या पत्त्यावर सोबतच्या नमुन्यातील नोटीसी द्वारे साध्या पोस्टाने कळविणे बंधनकारक राहील. **(सोबत नमूना जोडला आहे.जोड पत्र क्रमांक एस -०१,एस- १-अ,एस १-ब )**

**१) प्रथम थकबाकी हप्ता मागणी नोटीस**

I) ज्या संस्थांचा मुदत कर्जाचा एक हप्ता थकित झाला आहे, अथवा त्यावरील व्याज थकीत झाले आहे.

II) ज्या संस्थांनी मंजूर क्लिन कॅश क्रेडिट, कॅश क्रेडिट, नजरगहाण कर्ज मर्यादेपोटी उचल घेतल्यानंतर कर्ज खात्यावर सलग ९० दिवसांत कोणतेही व्यवहार केले नाहीत / व्याजाचा भरणा केला नाही, अथवा व्याजामुळे कर्ज खाते ओव्हरड्रॉन झालेले आहे. व याबाबत पूर्तता कार्यवाही करणे बाबत संस्थेस तसेच संस्थेच्या सर्व पदाधिकारी व सर्व संचालकांना लेखी नोटीसीद्वारे कळवूनही संस्थेने पूर्तता तसेच व्याजाचा भरणा केलेला नाही.

III) ज्या संस्थांनी मंजूर क्लिन कॅश क्रेडिट, कॅश क्रेडिट, नजरगहाण कर्ज मर्यादेपोटी उचल केलेल्या कर्ज खात्याची मुदत संपुष्टात आलेली आहे, व संस्थेने कर्ज खात्यांची मुदत संपण्यापूर्वी ६० दिवस कर्ज मर्यादा नुतनीकरणाचे प्रस्ताव सादर केलेले नाहीत. याबाबत संस्थेस व संस्थेच्या सर्व पदाधिकारी व संचालकांना लेखी नोटीसीव्दारे कळवूनही संस्थेने पूर्तता केलेली नाही.

IV) ज्या संस्थांनी क्लिन कॅश क्रेडिट, कॅश क्रेडिट, नजरगहाण व कर्ज उचलीसाठीचे अनुषंगिक कागदपत्रे कर्ज मर्यादांच्या नुतनीकरण मंजूरीनंतर कर्ज दस्तऐवज सादर केलेली नाहीत. याबाबत संस्थेस संस्थेच्या सर्व पदाधिकारी सर्व संचालकांना पूर्तता करणेबाबत लेखी नोटीस दिल्यानंतरही संस्थेने पूर्तता केलेली नाही.

अशा संस्थांच्या पदाधिका-यांशी २१ ते ३० तारखेच्या दरम्यान शाखास्तरावरुन शाखा व्यवस्थापक/अधिका-यांनी दूरध्वनीवरुन संपर्क साधून संस्थेचे थकीत कर्ज वसुलीसाठी पाठपुरावा करावा व ज्या पदाधिका-यांशी संपर्क साधला त्याची नोंद विहित नमुन्यात ठेवण्यात यावी. **(सोबत नमुना जोडला आहे जोडप्रत क्र. एस- ०२ )** ३० तारखेपर्यंत संपूर्ण थकीत रककमेचा व्याजासह भरणा न झाल्यास पुढील महिन्यांच्या ५ तारखेस **अशा थकबाकीदार संस्थेला, संस्थेचे सर्व पदाधिकारी व सर्व संचालकांना त्यांच्या राहण्याच्या पत्त्यावर** त्यांनी बँकेस करुन दिलेल्या जॉईंट ॲन्ड सेव्हरल लायेबीलीटी गॅरंटी बॉन्ड नुसार कर्जपरतफेडीच्या वैयक्तिक व सामुहीक जबाबदारीबाबतचा उल्लेख करुन थकित रक्कमेचा **७ दिवसांत** भरणा करावा अन्यथा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९१/१०१ अंतर्गत वसुलीची कायदेशीर कारवाई केली जाईल असे **प्रथम मागणी नोटीस** साध्या पोस्टाने बजाविणे बंधनकारक राहील. **(सोबत प्रथम थकबाकी हप्ता मागणी नोटीस नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.एस -०३) सदर नोटीसीचा व इतर अनुषंगिक खर्च संमत धोरणानुसार थकबाकीदार संस्थेकडून वसुल करणेत यावा.**

२) **द्वितीय थकबाकी हप्ता मागणी नोटीस**

I) ज्या संस्थांचे मुदत कर्जाचे दोन हप्ते थकित झाले आहेत, अथवा त्यावरील व्याज थकीत झाले आहे.

II) ज्या संस्थांनी प्रथम मागणी नोटीस बजावल्यानंतरही क्लिन कॅश क्रेडिट, कॅश क्रेडिट, नजरगहाण कर्ज खात्यावर संस्थांनी सलग ९० दिवसांत कोणतेही व्यवहार केले नाहीत / व्याजाचा भरणा केला नाही, अथवा व्याजामुळे खाते ओव्हरड्रॉन झालेले आहे.

III) ज्या संस्थांनी प्रथम मागणी नोटीस बजावल्यानंतर क्लिन कॅश क्रेडिट, कॅश क्रेडिट, नजरगहाण कर्ज सुविधा असणा-या संस्थांच्या खात्याची मुदत संपुष्टात आलेली आहे, व कर्ज मर्यादा नुतनीकरणाचा प्रस्ताव सादर केलेला नाही.

IV) प्रथम मागणी नोटीस दिल्यानंतरही क्लिन कॅश क्रेडिट, कॅश क्रेडिट , नजरगहाण कर्ज सुविधा असणा-या संस्थांनी नुतनीकरण कर्ज मंजूरीनंतर कर्ज दस्तऐवज व कर्ज उचल प्रस्ताव सादर केलेले नाहीत.

अशा संस्थांच्या पदाधिका-यांशी २१ ते ३० तारखेच्या दरम्यान शाखास्तरावरुन शाखा व्यवस्थापक/अधिका-यांनी दूरध्वनीवरुन संपर्क साधून संस्थेचे थकीत कर्ज वसुलीसाठी पाठपुरावा करावा व ज्या पदाधिका-यांशी संपर्क साधला त्याची नोंद विहित नमुन्यात ठेवण्यात यावी. **(सोबत नमुना जोडला आहे जोडप्रत क्र. एस-०४ )** ३० तारखेपर्यंत संपूर्ण थकीत रककमेचा व्याजासह भरणा न झाल्यास पुढील महिन्यांच्या ५ तारखेस **अशा थकबाकीदार संस्थेला व त्यांचे सर्व पदाधिकारी व सर्व संचालकांना** त्यांच्या राहण्याच्या पत्त्यावर थकित रक्कमेचा भरणा **७ दिवसांत** करावा, अन्यथा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९१/१०१ नुसार सहकार न्यायालयात / संबंधीत निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे वसुलीकरीता दावा दाखल करणेत येईल, अशी **द्वितीय मागणी नोटीस** रजिस्टर ए.डी. पोस्टाने बजावणे बंधनकारक राहील. **(सोबत द्वितीय थकबाकी हप्ता मागणी नोटीस नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.एस -०५) सदर नोटीसीचा व इतर अनुषंगिक खर्च रक्कम संमत धोरणानुसार संस्थेकडून वसुल करण्यात यावा.**

३) **थकबाकी वसुलीसाठी ३० दिवसांची अंतिम मागणी नोटीस**

I) प्रथम व द्वितीय थकबाकी हप्ता मागणी नोटीस बजावल्यानंतर ज्या संस्थांचे मुदत कर्जाचे तीन हप्ते थकित झाले आहेत, अथवा त्यावरील व्याज थकीत झाले आहे.

II) प्रथम व द्वितीय थकबाकी हप्ता मागणी नोटीस बजावल्यानंतरही क्लिन कॅश क्रेडिट, कॅश क्रेडिट, नजरगहाण कर्ज सुविधा असणा-या संस्थांनी कर्ज खात्यावर कोणतेही व्यवहार केले नाहीत / व्याजाचा भरणा केला नाही, अथवा व्याजामुळे खाते ओव्हरड्रॉन झालेले आहे.

III) प्रथम व द्वितीय थकबाकी हप्ता मागणी नोटीस दिल्यानंतरही क्लिन कॅश क्रेडिट, कॅश क्रेडिट, नजरगहाण कर्ज सुविधा असणा-या संस्थांच्या खात्याची मुदत संपुष्टात आलेली आहे, व कर्ज नुतनीकरणाचा प्रस्ताव सादर केलेला नाही.

IV) प्रथम व द्वितीय थकबाकी हप्ता मागणी नोटीस बजावल्यानंतरही ज्या संस्थांनी कॅश क्रेडिट, क्लिन कॅश क्रेडिट, नजरगहाण कर्ज खात्यांच्या नुतनीकरण मंजूरीनंतर कर्ज दस्तऐवज व कर्ज उचल प्रस्ताव सादर केलेले नाहीत.

अशा थकबाकीदार संस्थांच्या पदाधिका-यांशी २१ ते ३० तारखेच्या दरम्यान शाखास्तरावरुन शाखा व्यवस्थापक/अधिका-यांनी दूरध्वनीवरुन संपर्क साधून संस्थेचे थकीत कर्ज वसुलीसाठी पाठपुरावा करावा व ज्या पदाधिका-यांशी संपर्क साधला त्याची नोंद विहित नमुन्यात ठेवण्यात यावी. **(सोबत नमुना जोडला आहे जोडप्रत क्र. एस- ०६ )** ३० तारखेपर्यंत संपूर्ण थकीत रककमेचा व्याजासह भरणा न झाल्यास **पुढील महिन्यांच्या ५ तारखेस अशा थकबाकीदार संस्थेला, व त्यांचे सर्व पदाधिकारी व सर्व संचालकांना** त्यांच्या राहण्याच्या, नोकरी / व्यवसायाच्या व गावच्या पत्त्यावर **३० दिवसांत** संपुर्ण थकीत कर्ज व्याजासह रक्कमेचा भरणा करावा, अन्यथा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१/१०१ नूसार सहकार न्यायालयात /संबंधीत निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे वसुलीकरीता दावा दाखल करणेत येईल, अशी **अंतिम मागणी नोटीस** रजिस्टर ए.डी. पोस्टाने बजावणे बंधनकारक राहील. **(सोबत थकबाकी वसुलीसाठी ३० दिवसांची अंतिम मागणी नोटीस नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.एस - ०७) सदर नोटीसीचा व इतर अनुषंगिक खर्च संमत धोरणानुसार संस्थेकडून वसुल करण्यात यावा.**

ज्या संस्था तीन हप्ते थकीत झाल्यानंतर त्यांचेवर थकबाकी वसुलीसाठी वरीलप्रमाणे तीन मागणी नोटीसा बजावल्यानंतरही संपूर्ण थकबाकीचा व्याजासह भरणा करणार नाहीत, अशा थकबाकीदार संस्थांविरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९१/१०१ अंतर्गत सहकार न्यायालयात / संबंधीत निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे दावे दाखल करणेकरीता शाखा व्यवस्थापकांनी संबंधीत संस्थेला पाठवलेल्या अंतिम नोटीसची मुदत संपताच **१० दिवसाच्या कालावधीत** शाखेने थकीत कर्ज वसुलीसाठी केलेल्या कारवाईचे तपशीलासह पुढील कारवाईसाठी लेखी पत्राने केंद्रकार्यालयाच्या कर्ज विभागास कळविणे बंधनकारक राहील. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.एस - ०८)**

**उपरोक्त प्रमाणे थकबाकी वसूलीची कारवाई करणेची जबाबदारी शाखा व्यवस्थापकांची राहील, व त्यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी विभागीय कार्यालयाची राहील.**

**केंद्र कार्यालय पातळीवरील कर्ज व कायदा विभागामार्फत थकबाकी वसुलीकरिता करावयाची कारवाई**

थकबाकीदार संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१/१०१ अंतर्गत कर्ज वसुली दावे दाखल करणे बाबतचे प्रस्ताव **शाखांकडून विहित नमुन्यात प्राप्त झाल्यानंतर लगतच्या होणा-या पहिल्या संचालक मंडळ सभेत थकबाकीदार संस्था, त्या संस्थेचे सर्व पदाधिकारी व सर्व संचालक** यांचे विरोधात कर्ज विभागामार्फत संपुर्ण कर्ज व्याजासह वसुलीचा दावा दाखल करण्यासाठीचा व संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ अन्वये कारवाई करुन बँकेच्या अधिका-याची **प्राधिकृत अधिकारी** म्हणुन कलम ७७ अ अन्वये नियुक्ती करणेकरीता विषय सादर करणे बंधनकारक राहील. कर्ज वसुलीचा दावा दाखल करणेबाबत मंजूर झालेला ठराव व अनुषंगिक पत्रव्यवहार पुढील कार्यवाहीसाठी संचालक मंडळ सभेनंतरच्या ५ दिवसात कायदा विभागास सादर करणे बंधनकारक राहील. कायदा विभागामार्फत संबंधीत थकबाकीदार संस्थेस व त्यांच्या सर्व पदाधिकारी व सर्व संचालकांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१/१०१ अंतर्गत **७ दिवसात** संपूर्ण कर्ज थकबाकीचा व्याजासह भरणा करणेबाबत **मागणी नोटीस** रजिस्टर ए.डी. पोस्टाने **त्यांच्या राहण्याच्या, नोकरी/ व्यवसायाच्या व गावच्या पत्त्यावर बजावणे** बंधनकारक राहील. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.एस - ०९)**

मागणी नोटीसीनुसार थकबाकीदार संस्थेने संपुर्ण थकबाकीचा व्याजासह भरणा न केल्यास सात दिवसांचा कालावधी संपताच, **पाच दिवसांच्या** कालावधीत कायदा विभागामार्फत संपूर्ण कर्ज येणेबाकीचा व्याजासह **१५ दिवसांत** भरणा करणेबाबत **अंतिम मागणी नोटीस** (Final recall notice) **संस्थेच्या पत्त्यावर रजिस्टर ए.डी. पोस्टाने तसेच साध्या पोस्टाने बजावणे बंधनकारक राहील. (सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.एस - १०)**

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर संपुर्ण थकीत कर्जाचा व्याजासह भरणा झाला नाही तर, कायदा विभागामार्फत थकबाकीदार संस्था व त्यांचे सर्व पदाधिकारी व सर्व संचालकांच्या विरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१/१०१ अंतर्गत मा.सहकार न्यायालयात/ संबंधीत निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे बँकेच्या तालीकेवरील वकिलांमार्फत / अधिकृत अधिका-यांमार्फत कर्ज वसुलीचे दावे दाखल करावयाची कारवाई अंतिम मागणी नोटीसीचा कालावधी संपताच **१५ दिवसात** करणे बंधनकारक राहील. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.एस - ११)**

तसेच कायदा विभागा मार्फत सदर थकबाकीदार संस्थांवर कलम ७८ खाली कारवाई करुन बँकेच्या अधिकाऱ्यांची 'प्राधिकृत अधिकारी' म्हणून कलम ७७ अ अन्वये नियुक्ती करणेकरीता सहकार खात्याकडे **१५ दिवसांत** पत्रव्यवहार करणे बंधनकारक राहील. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.एस - १२)**

थकबाकीदार संस्थांविरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१ अंतर्गत ॲवार्ड (Award) व अंमलबजावणी दाखला अथवा कलम १०१ अंतर्गत वसुली दाखला (Award) कायदा विभागास प्राप्त झाल्यानंतर सदरचे ॲवार्डस् व अंमलबजावणी दाखले थकबाकीदार संस्थेच्या व संस्थेच्या सर्व पदाधिकारी व सर्व संचालकांच्या चल / अचल मालमत्तेवर बोजा नोंदविणे, मालमत्ता हस्तांतरणास हरकती दाखल करणे, मालमत्तांची जप्ती करणे, कलम ४९ अंतर्गत पगार जप्ती करणे, जप्त मालमत्तेचे शासकीय मुल्यांकनकाराकडुन मुल्यांकन करुन घेणे, वाजवी मुल्यास मा. जिल्हा उपनिबंधकांची मंजूरी घेणे, जाहीर लिलावाद्वारे विक्रीची जाहीरात प्रसिध्द करणे, लिलावाची प्रक्रिया

पुर्ण करुन मा. जिल्हा उपनिबंधक यांचेकडुन विक्रीचा दाखला मिळविणे (Sale certificate) इत्यादी कारवाई विशेष वसुली अधिका-यामार्फत करणेसाठी **सदरचे अॅवार्डस् व वसुली / अंमलबजावणी दाखले कर्ज वसुली विभागास ३ दिवसांच्या कालावधीत सादर करणे बंधनकारक राहील.**

**कर्ज वसुली विभागामार्फत करावयाची कारवाई :-**

कर्ज वसुली विभागामार्फत विशेष वसुली व विक्री अधिकाऱ्यांना वसुली /अंमलबजावणी दाखला प्राप्त झाल्यानंतर **५ दिवसांत** थकबाकीदार संस्था, संस्थेचे सर्व पदाधिकारी व सर्व संचालक यांना वसुली दाखल्यातील संपूर्ण मुद्दल व व्याज तसेच इतर अनुषगिंक खर्चाची रक्कमेचा भरणा करणेबाबत **१५ दिवसांच्या मुदतीची मागणी नोटीस** त्यांच्या राहण्याच्या पत्त्यावर रजिस्टर्ड ए.डी. पोस्टाने तसेच नोकरी / व्यवसायाच्या व गावच्या पत्त्यावर साध्या पोस्टाने बजावणे बंधनकारक राहील. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.एस - १३)**

१५ दिवसांच्या मागणी नोटीसीचा कालावधी संपताच पाच दिवसांत **७ दिवसांच्या मुदतीची जप्तीपूर्व मागणी नोटीस** थकबाकीदार संस्था, संस्थेचे सर्व पदाधिकारी व सर्व संचालक यांच्या राहण्याच्या पत्त्यावर रजिस्टर्ड ए.डी. पोस्टाने तसेच नोकरी / व्यवसायाच्या व गावच्या पत्त्यावर साध्या पोस्टाने बजावणे बंधनकारक राहील **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.एस - १४)**

दरम्यानच्या काळात विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकाऱ्यांनी संस्थेचे सर्व पदाधिकारी व सर्व संचालक यांच्या मुंबईतील, मुंबई बाहेरील व गावच्या चल-अचल, स्थावर-जंगम मालमत्तांचा शोध घेवून गाव कामगार तलाठी, ग्रामसेवक, तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी यांचेकडे पत्रव्यवहार करून वसुली दाखल्याप्रमाणे संपुर्ण येणे कर्जाचा बोजा नोंदविणे बंधनकारक राहील. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.एस - १५,एस - १५-अ,एस - १५-ब, एस - १५-क)**

त्यानंतरही संपुर्ण कर्जाचा व्याजासह भरणा न केल्यास **४८ तासाच्या मुदतीचे जप्तीपुर्विचे अंतिम नोटीस** पाच दिवसांत थकबाकीदार संस्था, संस्थेचे सर्व पदाधिकारी व सर्व संचालक यांच्या राहण्याच्या पत्त्यावर रजिस्टर्ड ए.डी. पोस्टाने तसेच नोकरी / व्यवसायाच्या व गावच्या पत्त्यावर साध्या पोस्टाने बजावणे बंधनकारक राहील. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.एस - १६)**

४८ तासांच्या मुदतीची जप्तीपुर्वीची नोटीस बजावल्यानंतरही संस्थेने संपुर्ण कर्जाचा वसुली दाखल्याप्रमाणे व्याजासह भरणा न केल्यास थकबाकीदार संस्थेची व संस्थेच्या संचालकांची चल-अचल, स्थावर-जंगम मालमत्ता जप्तीचा आदेश गरजेनुसार पोलीस संरक्षणात बजावणे बंधनकारक राहील. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.एस - १७, )**

तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ४९ अंतर्गत पंधरा दिवसांचे आत संस्थेचे सर्व पदाधिकारी व सर्व संचालक नोकरदार असल्यास त्यांच्या पगार जप्तीची कारवाई पूर्ण करण्यात यावी. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.एस - १८)**

मालमत्ता जप्तीबाबत दिलेल्या आदेशानुसार जप्त केलेल्या मालमत्तेचे शासनमान्य मुल्यांकनकाराकडून बाजारभावाप्रमाणे वाजवी मुल्यांकन दाखला (Upset Market price Valuation Report ) **पंधरा दिवसांचे** आत घेण्यात यावा. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.एस - १९)**

तद्नंतर जप्त केलेल्या मालमत्तेच्या वाजवी मुल्यांकनास मा. जिल्हा उपनिबंधकांची मान्यता मिळाल्यानंतर जप्त सदनिका /मालमता लिलावाद्वारे विक्री करणेबाबत आवश्यकत्या माहितीसह एक मराठी व एक इंग्रजी अशा दोन वर्तमानपत्रांमध्ये तसेच बँकेच्या website वर **सात दिवसांच्या** आत **१५ दिवसांच्या** मुदतीची जाहिर लिलावाद्वारे विक्रीची नोटीस प्रसिध्द करुन सिल बंद निविदा, तारीख नमूद करुन मागविण्यात याव्यात. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.एस - २०)**

सदरहू प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीची प्रत थकबाकीदार सहकारी संस्था, संस्थेचे सर्व पदाधिकारी व सर्व संचालक यांच्या राहण्याच्या पत्त्यावर रजिस्टर्ड ए.डी. पोस्टाने तसेच नोकरी / व्यवसायाच्या व गावच्या पत्त्यावर साध्या पोस्टाने पाठविणे बंधनकारक राहील. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.एस - २१)**

तद्नंतर जाहिरातीनुसार, जाहिरातीची मुदत संपल्यानंतर प्राप्त झालेल्या निविदा प्रस्तावांची विहित पध्दतीने स्वतंत्र रजिस्टरमध्ये नोंद करणे बंधनकारक राहील. त्याच दिवशी ताबडतोब प्राप्त झालेले सर्व निविदा प्रस्ताव निविदाधारक व कर्ज वसुली व्यवस्थापक यांचे समक्ष उघडून व त्याची नोंद रजिस्टर मध्ये करुन उपस्थितांच्या स्वाक्ष-या उघडलेल्या निविदांवर व रजिस्ट्रमध्ये घेणे बंधनकारक राहील. तसेच निविदा प्रस्ताव स्विकृत करतेवेळी धोरणानुसार जिल्हा उपनिबंधक यांनी मंजूरी दिलेल्या विक्री योग्य मुल्याकंन रक्कमेच्या १०% प्रमाणे अनामत रक्कम डी.डी. अथवा पे - ऑर्डरद्वारे घेणे बंधनकारक राहील.

तद्नंतर लगेच, त्याचवेळी लिलाव प्रक्रिया सुरू करुन उच्चतम बोलीदाराचे नाव व इतर तपशिल विहीत नमुन्यात घोषित करुन उच्चतम बोलीदारास लेखी पत्राद्वारे कळविण्यात यावे व लिलावा प्रक्रीयेत अपात्र ठरलेल्या इतर बोलीदारांच्या अनामत रक्कमेचे डीडी अथवा पे - ऑर्डर परत करण्यात याव्यात. व ज्या थकबाकीदार संस्थेची अथवा संस्थेच्या संचालकांची मालमत्ता लिलावाद्वारे विक्री करण्यात आली अशा संस्थेस /संस्थेच्या संचालकांस लिलावाद्वारे मालमत्ता विक्रीच्या तपशिलाची माहिती लेखी पत्राद्वारे कळविणे बंधनकारक राहील. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र - क्र. एस - २२ )**

तद्नंतर त्या लिलाव विजेत्या उच्चतम बोलीदाराकडुन लिलावामध्ये मालमत्ता विक्रीबाबत निश्चित करण्यात आलेल्या रक्कमेच्या २५ % रक्कम ७ दिवसांचे आत भरुन घेणे कायद्याने बंधनकारक आहे. व ती रक्कम लगेच मुंबै बँकेच्या 'सस्पेन्स खाती' (Suspence A/C) जमा करणे बंधनकारक आहे. सदरच्या रक्कमेचा भरणा उच्चतम बोलीदाराने ७ दिवसात न केल्यास लिलाव प्रक्रिया रद्द करुन त्यांनी भरणा केलेली अनामत रक्कम जप्त करुन त्यास लेखी पत्राद्वारे कळविण्यात यावे. **( सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र - क्र. एस - २३ )**

तद्नंतर लिलाव प्रक्रियेद्वारे मालमत्ता विक्रीबाबत निश्चित करण्यात आलेल्या रक्कमेची उर्वरित ७५% रक्कम लिलाव विजेत्या बोलीदाराकडुन **२२ दिवसांचे** आत डी.डी. अथवा पे- ऑर्डरद्वारे भरुन घेणे कायद्याने बंधनकारक आहे. व ती रक्कम लगेच बँकेच्या 'सस्पेन्स खाती' (Suspence A/C) जमा करणे बंधनकारक आहे.

ज्या संस्थेची अथवा संस्थेच्या संचालकांची मालमत्ता जाहिर लिलावाद्वारे विक्री करण्यात आली आहे. अशा संस्थेने अथवा संस्थेच्या संचालकांनी मालमत्ता विक्री बाबत लिलाव प्रक्रियेमध्ये निश्चित करण्यात आलेल्या विक्री रक्कमेच्या ५% पेक्षा जास्तीची रक्कम लिलाव विक्रीची नोटीस प्राप्त

झाल्यापासून **३० दिवसात** बँकेकडे भरणा केल्यास लिलाव प्रक्रिया रद्द करण्यात यावी अन्यथा अशा रक्कमेचा भरणा न झाल्यास लिलाव प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

तद्नंतर मालमत्तेच्या विक्री व्यवहारास मा.जिल्हा उपनिबंधक यांची मान्यता ( Sale confirmation) घेणेसाठी विहित नमुन्यात **पाच दिवसांत अर्ज करणे बंधनकारक राहील. (सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.एस - २४)**

तद्नंतर मा. जिल्हा उपनिबंधकांची विक्री व्यवहारास लेखी मान्यता मिळाल्यानंतर थकबाकीदाराच्या मालमत्तेची लिलाव विजेत्या बोलीदारास प्रत्यक्ष ताबा देणेसाठी लगत असलेल्या पोलीस स्टेशनमध्ये संरक्षणासाठी विहित नमुन्यात अर्ज करावा व पोलीस संरक्षणात मालमत्तेचा ताबा विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी विजेत्या बोलीदारास देणे बंधनकारक राहील. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.एस - २५)**

मालमत्तेचा ताबा उच्चतम बोलीदारास दिल्यानंतर बँकेच्या सस्पेन्स खाती जमा केलेली १००% रक्कम थकबाकीदार कर्जदार संस्थेच्या कर्ज खाती दोन दिवसात वळती करून व्यवहार पूर्ण करणेत यावा. व त्याबाबत थकबाकीदार संस्था, संस्थेचे सर्व पदाधिकारी व सर्व संचालक यांना तसे लेखी पत्राद्वारे कळविणे बंधनकारक आहे. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.२६)**

**उपरोक्त प्रमाणे कर्ज वसुलीची कारवाई पुर्ण होऊन थकीत कर्ज खाते निरंक झालेनंतर, कर्ज वसुलीची कारवाई पुर्ण झाल्याचा अहवाल मा. व्यवस्थापक, कर्ज वसुली विभाग यांना पाच दिवसांत सादर करावा.**

**ब) वैयक्तिक कर्ज थकबाकी वसुलीची कार्यप्रणाली :-**

**शाखा पातळीवरील कार्यवाही :-**

वैयक्तिक कर्जदारांना शाखा व्यवस्थापक किंवा शाखेतील अधिकारी यांनी दूरध्वनीवरून संपर्क साधून तसेच प्रत्यक्ष भेट देवून घरकर्ज, मालमत्ता तारण, वाहन तारण, शैक्षणिक इत्यादी मुदत कर्जाचे थकीत हप्ते भरणा करणे. कर्ज खात्यावर नियमित व्यवहार करणे, दरमहा व्याजाचा भरणा करणे व कर्ज मर्यादेची मुदत संपुष्टात येण्याच्या ६० दिवस आधी नुतनीकरण प्रस्ताव सादर करणेकरीता सूचित करावे. तसेच **९०** दिवस कर्ज खात्यावर व्यवहार न केल्यास किंवा ९० दिवस व्याजाचा भरणा न केल्यास कर्ज खाते एन.पी.ए. होणार असल्याबाबत लेखी पत्राने कर्जदार, सहकर्जदार यांच्या राहत्या पत्त्यावर साध्या पोस्टाने कळविणे बंधनकारक राहील. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र. आय - ०१, आय - ०१अ, आय - ०१ब )**

**१) प्रथम थकबाकी हप्ता मागणी नोटीस**

I) ज्या वैयक्तिक कर्जदारांचा एक हप्ता अथवा त्यावरील व्याज थकीत झाले आहे.

II) साठामाल / मशिनरी तारण नजरगहाण कॅश क्रेडिट, स्थावर मालमत्ता तारण कॅश क्रेडिट, कर्ज सुविधा असणा-या कर्जदारांनी खात्यावर सलग ९० दिवसांत व्यवहार केले नाहीत अथवा व्याजाचा भरणा केला नाही अथवा व्याजामुळे कर्जखाते ओव्हरड्रॉन झालेले आहे. व याबाबत लेखी नोटीसीद्वारे कळवूनही व्याजाचा भरणा केलेला नाही.

III) साठामाल / मशिनरी तारण नजरगहाण कॅश क्रेडिट, स्थावर मालमत्ता तारण कॅश क्रेडिट, खात्यांची मुदत संपुष्टात आलेली असून व अशा कर्जदारांनी कर्ज मर्यादा नुतनीकरण प्रस्ताव ६० दिवस आगोदर सादर केलेला नाही व याबाबत लेखी नोटीसीद्वारे कळवून ही कर्ज नुतनीकरण प्रस्ताव सादर केलेला नाही.

IV) साठामाल / मशिनरी तारण नजरगहाण कॅश क्रेडिट, स्थावर मालमत्ता तारण कॅश क्रेडिट, खात्यांच्या नुतनीकरण मंजूरीनंतर कर्ज उचलीसाठी आवश्यक दस्तऐवज/अनुषंगिक कागदपत्रे (कर्ज उचल प्रस्ताव) सादर केलेले नाहीत व याबाबत लेखी नोटीसीद्वारे कळवूनही कर्ज उचल प्रस्ताव सादर केलेले नाही.

कर्ज थकबाकी झाल्यानंतर २१ ते ३० तारखेच्या दरम्यान शाखास्तरावरुन शाखा व्यवस्थापक/अधिका-यांनी थकबाकीदार कर्जदार, सहकर्जदार व जानिमदारांशी दूरध्वनीवरुन संपर्क साधून थकीत कर्ज वसुलीसाठी पाठपुरावा करावा व ज्या कर्जदार व जानिमदारांशी संपर्क साधला त्याची नोंद विहित नमुन्यात ठेवण्यात यावी. **(सोबत नमुना जोडला आहे जोडप्रत्र क्र. आय - ०२ )** ३० तारखेपर्यंत संपूर्ण थकीत रककमेचा व्याजासह भरणा न झाल्यास **पुढील महिन्यांच्या ५ तारखेस** अशा कर्जदार, सहकर्जदार व त्यांचे जागिनदारांना राहत्या घराच्या पत्त्यावर **७ दिवसांत** थकीत रक्कमेचा भरणा करावा अन्यथा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ अंतर्गत कायदेशीर कारवाई करणेत येईल असे **प्रथम मागणी नोटीस** साध्या पोस्टाने बजावणे बंधनकारक राहील. **(सोबत प्रथम थकबाकी हप्ता मागणी नोटीस नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.आय - ०३) सदर नोटीसीचा व इतर अनुषंगिक खर्च संमत धोरणानुसार थकबाकीदार कर्जदाराकडून वसुल करण्यात यावा.**

## २) द्वितीय थकबाकी हप्ता मागणी नोटीस

I) ज्या वैयक्तिक कर्जदारांचे दोन हप्ते थकीत झाले आहेत अथवा त्यावरील व्याज थकीत झाले आहे.

II) प्रथम मागणी नोटीस बजावल्यानंतरही ज्या साठामाल / मशिनरी तारण नजरगहाण कॅश क्रेडिट, स्थावर मालमत्ता तारण कॅश क्रेडिट, कर्जदारांनी कर्ज खात्यावर कोणतेही व्यवहार केले नाहीत अथवा व्याजाचा भरणा केला नाही अथवा व्याजामुळे खाते ओव्हरड्रॉन झालेले आहे.

III) साठामाल / मशिनरी तारण नजरगहाण कॅश क्रेडिट, स्थावर मालमत्ता तारण कॅश क्रेडिट, कर्ज खात्याची मुदत संपुष्टात आलेली असून व अशा कर्जदारांनी कर्ज मर्यादा नुतनीकरण प्रस्ताव सादर केलेला नाही.

IV) साठामाल / मशिनरी तारण नजरगहाण कॅश क्रेडिट, स्थावर मालमत्ता तारण कॅश क्रेडिट, कर्ज खात्यांच्या नुतनीकरण मंजूरीनंतर कर्ज उचलीसाठी आवश्यक दस्तऐवज / अनुषंगिक कागदपत्रे (कर्ज उचल प्रस्ताव) सादर केलेले नाहीत.

कर्ज थकबाकी झाल्यानंतर २१ ते ३० तारखेच्या दरम्यान शाखास्तरावरुन शाखा व्यवस्थापक/अधिका-यांनी थकबाकीदार कर्जदार, सहकर्जदार व जानिमदारांशी दूरध्वनीवरुन संपर्क साधून थकीत कर्ज वसुलीसाठी पाठपुरावा करावा व ज्या कर्जदार व

जानिमदारांशी संपर्क साधला त्याची नोंद विहित नमुन्यात ठेवण्यात यावी. **(सोबत नमुना जोडला आहे जोडपत्र क्र. आय - ४ )** ३० तारखेपर्यंत संपूर्ण थकीत रक्कमेचा व्याजासह भरणा न झाल्यास **पुढील महिन्यांच्या ५ तारखेस** अशा कर्जदार, सहकर्जदार व त्यांचे जामिनदारांना राहत्या घराच्या पत्त्यावर थकीत रक्कमेचा ७ दिवसांत भरणा करावा अन्यथा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ नुसार संबंधित निबंधक सहकारी संस्था यांचेकडे वसुलीकरीता दावा दाखल करणेत येईल अशी **द्वितीय मागणी नोटीस** साध्या पोस्टाने बजावणे बंधनकारक राहील. **(सोबत द्वितीय थकबाकी हप्ता मागणी नोटीस नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.आय - ५ ) सदर नोटीसीचा व इतर अनुषंगिक खर्च संमत धोरणानुसार वैयक्तिक कर्जदाराकडून वसुल करण्यात यावा.**

## ३) थकबाकी वसुलीसाठी ३० दिवसाची अंतिम मागणी नोटीस

I) प्रथम व द्वितीय थकबाकी हप्ता मागणी नोटीस बजावल्यानंतर ज्या वैयक्तिक कर्जदारांचे तीन हप्ते थकीत झाले आहेत अथवा त्यावरील व्याज थकीत झाले आहे.

II) प्रथम व द्वितीय मागणी नोटीस बजावल्यानंतरही साठामाल/ मशिनरी तारण नजरगहाण कॅश क्रेडिट, स्थावर मालमत्ता तारण कॅश क्रेडिट, कर्ज खात्यावर कोणतेही व्यवहार केले नाहीत अथवा व्याजाचा भरणा केला नाही अथवा व्याजामुळे खाते ओव्हरड्रॉंग झालेले आहे.

III) प्रथम व द्वितीय मागणी नोटीस बजावल्यानंतरही साठामाल / मशिनरी तारण नजरगहाण कॅश क्रेडिट, स्थावर मालमत्ता तारण कॅश क्रेडिट, कर्ज खात्याची मुदत संपुष्टात आलेली आहे व कर्ज नुतनीकरणाचा प्रस्ताव सादर केलेला नाही.

IV) प्रथम व द्वितीय मागणी नोटीस बजावल्यानंतरही साठामाल / मशिनरी तारण नजरगहाण कॅश क्रेडिट, स्थावर मालमत्ता तारण कॅश क्रेडिट, कर्ज खात्यांच्या नुतनीकरण मंजूरीनंतर कर्ज उचलीसाठी आवश्यक दस्तऐवज /अनुषंगिक कागदपत्रे (कर्ज उचल प्रस्ताव) सादर केलेले नाहीत.

कर्ज थकबाकी झाल्यानंतर २१ ते ३० तारखेच्या दरम्यान शाखास्तरावरुन शाखा व्यवस्थापक/अधिका-यांनी थकबाकीदार कर्जदार, सहकर्जदार व जानिमदारांशी दूरध्वनीवरुन संपर्क साधून थकीत कर्ज वसुलीसाठी पाठपुरावा करावा व ज्या कर्जदार व जानिमदारांशी संपर्क साधला त्याची नोंद विहित नमुन्यात ठेवण्यात यावी. **(सोबत नमुना जोडला आहे जोडप्रत्र क्र. आय - ६) ३० तारखेपर्यंत संपूर्ण कर्ज थकबाकीचा व्याजासह भरणा न झाल्यास पुढील महिन्याच्या ५ तारखेस** अशा कर्जदारांना, सहकर्जदारांना व त्यांचे जामिनदारांना राहत्या, नोकरी/ व्यवसायाच्या व गावच्या पत्त्यावर **३० दिवसांत** संपुर्ण कर्ज येणेबाकी रक्कमेचा व्याजासह भरणा करावा अन्यथा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ नुसार संबंधित निबंधक सहकारी संस्था यांचेकडे वसुलीकरीता दावा दाखल करणेत येईल अशी संपूर्ण कर्ज व व्याज **वसुलीसाठी ३० दिवसाची अंतिम मागणी नोटीस** रजिस्टर्ड ए.डी. पोस्टाने बजावणे बंधनकारक राहील. **(सोबत थकबाकी अंतिम हप्ता मागणी नोटीस नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र. आय - ७) सदर नोटीसीचा व इतर अनुषंगिक खर्च रक्कम संमत धोरणानुसार थकीत कर्जदाराकडून वसुल करण्यात यावा.**

अंतिम नोटीसाची मुदत संपल्यानंतर कर्ज उचलीचे वेळी कर्जदारांकडून घेतलेले आगावू धनादेश समाशोधनाद्वारे वटविणेकरीता पाठविणेत यावेत व सदर धनादेश न वटल्यास कर्जदारांवर धनादेश न वटता परत आल्यानंतर **३ दिवसात** कर्जथकबाकीदारास भारतीय दंडविधानाचे कलम १३८ (Indian Pinal Code Section 138) अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे लेखी पत्राद्वारे कळविणे बंधनकारक राहील. (**सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र. आय - ८** ) व तद्नंतर बँकेच्या तालिकेवरील वकीलामार्फत पुढील कायदेशीर कारवाई करण्याचा प्रस्ताव केंद्र कार्यालयातील कायदा विभागाकडे सादर करणेत यावा.

तसेच अंतिम मागणी नोटीस बजावल्यानंतरही जे कर्जदार थकबाकीचा भरणा करणार नाहीत अशा थकबाकीदार कर्जदार, सहकर्जदार व जामिनदार यांचेविरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ अंतर्गत वसुली दाखला मिळविणे करीता निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात दावा दाखल करणेकरीता विहीत नमुन्यातील अर्ज, रक्कम भरणा केलेले आर.बी.आय. चलन, कोर्ट फी स्टॅम्प, अंतिम मागणी नोटीस, शाखा व्यवस्थापकांनी प्रमाणित केलेले कर्जदारांचे दस्तऐवज, कागदपत्रे इत्यादी पाच झेरॉक्स प्रतीसह परिपूर्ण प्रस्ताव अंतिम मागणी नोटीसीची मुदत संपताच **पाच दिवसात** सही शिक्क्यानिशी केंद्र कार्यालयातील लोन मॉनिटरींग विभागाकडे सादर करणे बंधनकारक राहील. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.आय - ०९)**

**उपरोक्तप्रमाणे थकबाकी वसुलीची कारवाई करणेची जबाबदारी शाखा व्यवस्थापकाची राहील व त्यावर नियंत्रण ठेवणेची जबाबदारी विभागीय कार्यालयाची राहील.**

थकीत सोनेतारण कर्ज खात्यांबाबत तारण ठेवलेल्या सोन्याची लिलावाद्वारे विक्री करण्यासंदर्भात जा.क्र. मुंबै बँक/ दक्षता विभाग / फा- कार्यालयीन परिपत्रक / २०१३ - १४ /२०१७३ दिनांक २२/८/२०१३ अन्वये बँकेच्या दक्षता विभागाने कळविलेल्या सुचनानुसार लिलावाद्वारे सोने विक्रीची कारवाई पूर्ण झाल्यानंतर थकीत सोने तारण कर्जाची संपूर्ण कर्ज वसुली न झाल्यास उर्वरित थकीत रक्कमेची व्याजासह वसुली करण्यासाठी **कर्जदारावर** उपरोक्त सूचनाप्रमाणे प्रथम, द्वितीय व अंतिम नोटीस बजावून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ अंतर्गत वसुली करीता उपरोक्त सूचनेनुसार दावे दाखल करणेचे प्रस्ताव तयार करुन कर्ज मॉनिटरींग विभागाकडे सादर करावेत. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.आय - १०)**

**केंद्र कार्यालय पातळीवरील लोन मॉनिटरींग व कर्ज वसुली विभागामार्फत करावयाची कारवाई :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ अंतर्गत कायदेशीर कारवाईकरणे करीता शाखांकडुन प्राप्त झालेल्या प्रस्तावांची योग्यप्रकारे तपासणी करुन मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा), माहिम (प.), मुंबई ४०० ०१६ यांचेकडे **७ दिवसांत** लोन मॉनिटरींग विभागामार्फत लवाद दावे दाखल करून किमान तीन महिन्यात वसुली दाखला प्राप्त करून घेण्यात यावा व प्राप्त झालेला वसुली दाखला **२ दिवसांत** पुढील कारवाईसाठी कर्ज वसुली विभागातील विशेष वसुली व विक्री अधिका-यास देण्यात यावा.

वसुली दाखला प्राप्त झालेल्या कर्जदार व त्यांचे जामिनदारांविरुध्द विशेष वसुली व विक्री अधिकाऱ्यांमार्फत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ४९ अंतर्गत सात दिवसांच्या आत नोकरीस असलेल्या कर्जदार, सहकर्जदार व सर्व जामिनदार यांच्या पगार जप्तीची कारवाई पुर्ण करण्यात यावी. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.आय - ११)**

विशेष वसुली व विक्री अधिकाऱ्यांनी वसुली दाखला प्राप्त झाल्यानंतर त्वरीत **३ दिवसांत** थकीत कर्जदार, सहकर्जदार व जामिनदार यांना संपुर्ण थकीत रक्कमेचा व्याजासह भरणा करणेकरीता **१५ दिवसांच्या** मुदतीची मागणी नोटीस त्यांच्या राहण्याच्या पत्तावर रजिस्टर्ड ए.डी. पोस्टाने तसेच नोकरी/ व्यवसायाच्या व गावच्या पत्त्यावर साध्या पोस्टाने बजावणे बंधनकारक राहील. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.आय - १२)**

१५ दिवसांच्या मागणी नोटीसीचा कालावधी संपताच दोन दिवसांत **७ दिवसांच्या** मुदतीची जप्तीपूर्व मागणी नोटीस थकीत कर्जदार, सहकर्जदार व जामिनदार यांच्या राहण्याच्या पत्त्यावर रजिस्टर्ड ए.डी. पोस्टाने तसेच नोकरी/ व्यवसायाच्या व गावच्या पत्त्यावर साध्या पोस्टाने बजावणे बंधनकारक राहील **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.आय - १३)**

दरम्यानच्या काळात विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकाऱ्यांनी थकीत कर्जदार, सहकर्जदार व जामिनदार यांच्या मुंबईतील, मुंबई बाहेरील व गावच्या चल-अचल, स्थावर-जंगम मालमत्तांचा शोध घेवून गाव कामगार तलाठी, ग्रामसेवक, तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी यांचेकडे पत्रव्यवहार करून बँकेच्या संपुर्ण येणे कर्जाचा बोजा नोंदविणे बंधनकारक राहील. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.आय - १४)**

त्यानंतरही संपुर्ण कर्जाचा व्याजासह भरणा न केल्यास **४८ तासाच्या** मुदतीचे जप्तीपुर्विचे अंतिम मागणी नोटीस **दोन** दिवसांत थकीत कर्जदार, सहकर्जदार व जामिनदार यांच्या राहण्याच्या पत्त्यावररजिस्टर्ड ए.डी. पोस्टाने तसेच नोकरी/ व्यवसायाच्या व गावच्या पत्त्यावर साध्या पोस्टाने बजावणे बंधनकारक राहील. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.आय - १५)**

४८ तासांच्या मुदतीची जप्तीपुर्वीची अंतिम मागणी नोटीस बजावल्यानंतरही थकीत कर्जदार, सहकर्जदार व जामिनदार यांनी संपुर्ण व्याजासह कर्जाचा भरणा न केल्यास थकीत कर्जदार, सहकर्जदार व जामिनदार यांच्या चल-अचल, स्थावर-जंगम मालमत्ता जप्तीचा आदेश गरजेनुसार पोलीस संरक्षणात बजावणे बंधनकारक राहील. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.आय - १६)**

विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी जप्तीची कारवाई केल्यानंतर जप्त केलेल्या मालमत्तेचा वाजवी बाजारभावानुसार मुल्यांकन दाखला (Upset Market price Valuation Report ) शासनमान्य मुल्यांकनकाराकडून **सात दिवसांचे** आत घेण्यात यावा. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.आय - १७)**

तद्नंतर जप्त केलेल्या मालमत्तेच्या वाजवी मुल्यांकनास मा. जिल्हा उपनिबंधकांची मान्यता मिळाल्यानंतर जप्त सदनिका /मालमता लिलावाद्वारे विक्री करणेबाबत आवश्यकत्या माहितीसह एक मराठी व एक इंग्रजी अशा दोन वर्तमानपत्रांमध्ये तसेच बँकेच्या website वर **सात दिवसांच्या** आत **१५ दिवसांच्या** मुदतीची जाहिर लिलावाद्वारे विक्रीची नोटीस प्रसिध्द करुन सिल बंद निविदा, तारीख नमूद करुन मागविण्यात याव्यात. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र. आय - १८ )**

सदरहू प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीची प्रत कर्जदार, सहकर्जदार व सर्व जामिनदार यांच्या राहण्याच्या पत्त्यावर रजिस्टर्ड ओ.डी. पोस्टाने तसेच नोकरी/ व्यवसायाच्या व गावच्या पत्त्यावर साध्या पोस्टाने पाठविणे बंधनकारक राहील. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.१९)**

तद्नंतर जाहिरातीनुसार, जाहिरातीची मुदत संपल्यानंतर प्राप्त झालेल्या निविदा प्रस्तावांची विहित पध्दतीने स्वतंत्र रजिस्टरमध्ये नोंद करणे बंधनकारक राहील. त्याच दिवशी ताबडतोब प्राप्त झालेले सर्व निविदा प्रस्ताव निविदाधारक व कर्ज वसुली व्यवस्थापक यांचे समक्ष उघडून व त्याची नोंद रजिस्टर मध्ये करुन उपस्थितांच्या स्वाक्ष-या उघडलेल्या निविदांवर व रजिस्ट्ररमध्ये घेणे बंधनकारक राहील. तसेच निविदा प्रस्ताव स्विकृत करतेवेळी धोरणानुसार जिल्हा उपनिबंधक यांनी मंजूरी दिलेल्या विक्री योग्य मुल्याकंन रक्कमेच्या १०% प्रमाणे अनामत रक्कम डी.डी. अथवा पे - ऑर्डरद्वारे घेणे बंधनकारक राहील.

तद्नंतर लगेच, त्याचवेळी लिलाव प्रक्रिया सुरू करुन उच्चतम बोलीदाराचे नाव व इतर तपशिल विहीत नमुन्यात घोषित करुन उच्चतम बोलीदारास लेखी पत्राद्वारे कळविण्यात यावे व लिलावा प्रक्रीयेत अपात्र ठरलेल्या इतर बोलीदारांच्या अनामत रक्कमेचे डी.डी. अथवा पे - ऑर्डर परत करण्यात याव्यात. व ज्या थकबाकीदार कर्जदाराची /जामिनदाराची मालमत्ता लिलावाद्वारे विक्री करण्यात आली अशा कर्जदारास /जामिनदारास मालमत्ता लिलावाद्वारे विक्रीच्या तपशिलाची माहिती लेखी पत्राद्वारे कळविणे बंधनकारक राहील. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र - क्र. आय - २० )**

तद्नंतर त्या लिलाव विजेत्या उच्चतम बोलीदाराकडुन लिलावामध्ये मालमत्ता विक्रीबाबत निश्चित करण्यात आलेल्या रक्कमेच्या २५ % रक्कम **७ दिवसांचे** आत भरुन घेणे कायद्याने बंधनकारक आहे. व ती रक्कम लगेच बँकेच्या 'सस्पेन्स खाती' (Suspence A/C) जमा करणे बंधनकारक आहे. सदरच्या रक्कमेचा भरणा उच्चतम बोलीदाराने **७ दिवसात** न केल्यास लिलाव प्रक्रिया रद्द करुन त्यांनी भरणा केलेली अनामत रक्कम जप्त करुन त्यास लेखी पत्राद्वारे कळविण्यात यावे. **( सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र - क्र. आय - २१ )**

तद्नंतर लिलाव प्रक्रियेद्वारे मालमत्ता विक्रीबाबत निश्चित करण्यात आलेल्या रक्कमेची उर्वरित ७५% रक्कम लिलाव विजेत्या बोलीदाराकडुन **२२ दिवसांचे** आत डी.डी. अथवा पे- ऑर्डरद्वारे भरुन घेणे कायद्याने बंधनकारक आहे. व ती रक्कम लगेच बँकेच्या 'सस्पेन्स खाती' (Suspence A/C) जमा करणे बंधनकारक आहे.

अशा कर्जदार / जामिनदाराची मालमत्ता जाहिर लिलावाद्वारे विक्री करण्यात आली आहे. अशा कर्जदार / जामिनदाराने मालमत्ता विक्री बाबत लिलाव प्रक्रियेमध्ये निश्चित करण्यात आलेल्या विक्री रक्कमेच्या ५% पेक्षा जास्तीची रक्कम लिलाव विक्रीची नोटीस प्राप्त झाल्यापासून ३० दिवसात बँकेकडे भरणा केल्यास लिलाव प्रक्रिया रद्द करण्यात यावी अन्यथा अशा रक्कमेचा भरणा न झाल्यास लिलाव प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

तद्नंतर मालमत्तेच्या विक्री व्यवहारास मा.जिल्हा उपनिबंधक यांची मान्यता ( Sale confirmation) घेणेसाठी विहित नमुन्यात **पाच दिवसांत अर्ज करणे बंधनकारक राहील. (सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र. आय - २२ )**

तद्नंतर मा. जिल्हा उपनिबंधकांची विक्री व्यवहारास लेखी मान्यता मिळाल्यानंतर जाहीर लिलावाद्वारे विक्री केलेल्या थकबाकीदराच्या मालमत्तेचा लिलाव उच्चतम बोलीदारास प्रत्यक्ष ताबा देणेसाठी लगत असलेल्या पोलीस स्टेशनमध्ये संरक्षणासाठी विहित नमुन्यात अर्ज करावा व पोलीस संरक्षणात मालमत्ता ताबा उच्चतम बोलीदारास देऊन पंचनामा तयार करुन पोहोच घेण्यात यावी. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र.आय - २३)**

मालमत्तेचा ताबा उच्चतम बोलीदारास दिल्यानंतर सस्पेन्स खाती जमा केलेली १००% रक्कम थकबाकीदार कर्जदाराच्या कर्ज खाती लगेच वळती करून व्यवहार पूर्ण करणेत यावा, व त्याबाबत थकबाकीदार कर्जदार, सहकर्जदार व सर्व जामिनदार यांना तसे लेखी पत्राद्वारे कळविणे बंधनकारक आहे. **(सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र. आय - २४)**

**उपरोक्त प्रमाणे कर्ज वसुलीची कारवाई पुर्ण होऊन थकीत कर्ज खाते निरंक झालेनंतर, कर्ज वसुलीची कारवाई पुर्ण झाल्याचा अहवाल मा. व्यवस्थापक, कर्ज वसुली विभाग यांना त्वरित सादर करावा. (सोबत नमुना जोडला आहे. जोडपत्र-क्र. आय - २५)**

MUMBAI DIST. CENT. CO-OP. BANK LTD. Loan Monitoring Section

Z:\Sandeep\sk128.doc